पहा 1. सहाय्यक अधिक्षक, लेखा व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, बीड यांची दिनांक 21/01/2025 रोजीची कार्यालयीन टिपणी व त्यावरील आदेश.
2. सहाय्यक अधिक्षक, लेखा व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, बीड यांची दिनांक 23/01/2025 रोजीची कार्यालयीन टिपणी व त्यावरील आदेश.

# जिल्हा व सत्र न्यायालय, बीड

## जाहीर लिलावाच्या सुचना / अटी व शर्ती

सर्व शासकीय मान्यता प्राप्त निरूपयोगी वस्तु खरेदीदार (भंगार विक्रेते) यांना जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यांत येते की, जिल्हा न्यायालयातील जी–9 मधील जडवस्तू संग्रहात नसलेल्या वापरण्या योग्य नसलेल्या वस्तूंचा खालील तपशीलाप्रमाणे शासकीय निरूपयोगी वस्तुंची विक्री जाहीर लिलावाद्वारे आहे त्या स्थितीत करावयाची आहे.

| लिलाव करावयाच्या वस्तु वर्णन |
|---|
| बीड जिल्हान्यायालयीन इमारतीमधील लाकडी तुकडे ई. निरूपयोगी वस्तु अंदाजे 70 किलो, लोखंडी निरूपयोगी वस्तु अंदाजे 80 किलो, प्लॉस्टीक निरूपयोगी वस्तु अंदाजे 10 किलो आणि पुठ्ठा बॉक्स निरूपयोगी वस्तु अंदाजे 10 किलो तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवठा केलेल्या जडवस्तु संग्रह नोंदवहीमधील अनुक्रमांक 05 मधील दोन कुजलेल्या लाकडी कुंडयाची जाहीर लिलावाद्वारे आहे त्या स्थितीत विक्री करावयाची आहे. |

1) उपरोक्त निरूपयोगी वस्तु जाहीर लिलाव जिल्हा न्यायालय, बीड येथील तळमजला हॉल नं जी–9 मध्ये **दिनांक 30/01/2025 रोजी सकाळी 11–00** वाजता सुरू होईल.
2) लिलाव करण्यात येणारे निरूपयोगी वस्तु कार्यालयीन वेळेत दूपारी 3 ते 5 वाजेपर्यंत पहावयास मिळेल.
3) इच्छूकांनी लिलावाच्या बोलीमध्ये भाग घेणेस्तव लिलाव सुरू होण्यापूर्वी आपले नांव, पुर्ण पत्ता मोबाईल कमांक व आय.डि (आधार कार्ड / पॅनकार्ड / मतदान कार्ड /शासकीय नोंदणीकृत भंगारवाले असल्याचे नोंदणी प्रमाणपत्र )देवून अनामत रक्कम रूपये 1000/– ही सहायक अधिक्षक वित्त विभाग जिल्हा न्यायालय, बीड येथे जमा करून नाव नोंदवावे, त्याशिवाय त्यांना लिलावात भाग घेता येणार नाही. ज्याची बोली स्विकारली नाही त्यांची अनामत रक्कम लगेच परत करण्यांत येईल.
4) लिलावामध्ये सर्वांत जास्तीची बोली बोलणा–यास व बोलीची रक्कम सक्षम अधिका–यास योग्य वाटल्यास व ती मान्य झाल्यास संबंधितास बोलीची पुर्ण रक्कम त्याचदिवशी भरणा करावी लागेल आणि उक्त भंगार जसे आहे त्याच स्थितीत स्वखर्चाने घेवून जावे लागेल. तसेच स्वखर्चाने भंगार उचलने व घेवुन जाणे.
5) यशस्वी बोलीदाराला विकत घेतलेल्या निरूपयोगी वस्तु (भंगार) संपुर्ण रकमेवर नियमानुसार विक्रीकर व ईतर सर्व प्रकारचे कर व शुल्क भरणे बंधनकारक राहील. कोणतीही सुट मिळण्याचे प्रमाणपत्र लिलाव खरेदीसाठी ग्राहय धरले जाणार नाही.
6) लिलाव झाल्यानंतर या बाबतीत कुठल्याही / कोणत्याही हक्क किंवा तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
7) लिलावात विक्री केलेले निरूपयोगी वस्तु (भंगार) कुठल्याही सबबीवर परत घेतले जाणार नाही.
8) काही अपरिहार्य कारणास्तव जाहीर लिलाव निर्देशीत तारखेस न झाल्यास त्याबद्दलची पुढील तारीख व वेळ त्याचवेळेस कळविण्यांत येईल. तसेच योग्य किंमत न आल्यास लिलावाची कार्यवाही स्थगीत करण्याचे अधिकार प्रमुख जिल्हा न्यायाधीश, बीड यांनी राखून ठेवलेले आहेत. लिलावाच्या शासकीय प्रचलीत अटी व शर्ती लागू राहतील.

आदेशावरून,

24/1/2025

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, बीड.